# मुंबई विद्यापीठ

क्र.आस्था २ (४)/इएसटी/आयसीसी/२०१८–१९/3

परिपत्रक :–

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, प्रभारी, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, स्था. वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, सालाबाद प्रमाणे यावर्षी शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना व मुंबई विद्यापीठ अधिकारी व कर्मचा–यांच्यावतीने **छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीराव फुले, आरक्षणाचे जनक राजे शाहू महाराज आणि आधुनिक भारताचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्ती जयंती महोत्सव शनिवार दिनांक ५ मे, २०१८ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता सर फिरोजशहा मेहता सभागृह नागरीक व राज्यशास्त्र विभाग, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ, मुंबई–४०० ०९८** येथे आयोजित केले आहे. सदर कार्यक्रमास प्रशासनाने मंजुरी दिलेली आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीराव फुले, आरक्षणाचे जनक राजे शाहू महाराज आणि आधुनिक भारताचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्ती जयंती** महोत्सवानिमित्त समितीने आयोजिलेल्या कार्यक्रमास कर्मचाऱ्यांना उपस्थित राहाता यावे म्हणून संबधित विभाग प्रमुखांनी **शनिवार दिनांक ५ मे, २०१८ रोजी फोर्ट येथील कर्मचा–यांना दुपारी २.०० वाजता व विद्यानगरी येथील कर्मचा–यांना दुपारी ३.००** वाजता एखादी त्वरीत बाब असल्यास ती बाकी राहू नये, याची काळजी घेऊन परवानगी दयावी. जे कर्मचारी परवानगी घेऊनही सदर कार्यक्रमास उपस्थित राहणार नाहीत अशा कर्मचा–यांना त्या **अर्ध्या दिवसाची नैमित्तिक** रजा दयावी लागेल याची नोंद घ्यावी.

कुलसचिव (प्र)

मुंबई–४०००३२
मे, २०१८

क्र.आस्था(२/४)/इएसटी/आयसीसी/२०१८–१९/ मे, २०१८

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल,
प्रभारी संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
प्रभारी कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:–

१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
३. स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय
४. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर व विद्यानगरी परिसर)
५. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
६. सुरक्षा अधिकारी, तसेच सर्व सहायक सुरक्षा अधिकार
७. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख
८. उद्यान अधीक्षक/अधीक्षक (तांत्रिक), विधी विभाग
९. स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) प्र–कुलगुरू, (३) कुलसचिव (प्र), (४) स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी, (५) प्रभारी संचालक परिक्षा व मुल्यमापन मंडळ
१०. **सहचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना यांनी सदर कार्यक्रमास उपस्थित असलेल्या कर्मचा–यांची यादी प्रशासनास सादर करावी.**

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित:–

१. अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर असोसिएशन ( मुनोवा)
२. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ,
३. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना.

कुलसचिव (प्र)